# धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत देण्यात येणा-या सुखसोयींची माहिती

| अ.क्र. | विषय | धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत केलली तरतूद |
|---|---|---|
| १ | धारावी पुनर्विकास प्रकल्प. | धारावी अधिसुचित क्षेत्रात एकूण ५ सेक्टर्स तयार करण्यात आलेले आहेत. त्यातील सेक्टर क्र.५ हा दि.२१.०५.२०११ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास पुनर्विकास करण्याकरिता प्रदान केलेला आहे. व त्यानुसार पुनर्विकासाचे काम म्हाडामार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच सेक्टर १ ते ४ साठी स्पर्धात्मक निविदेद्वारे विकासक नेमण्याची कार्यवाही सुरू आहे. |
| २ | धारावी पुनर्विकास प्रकल्पातील मोफत सदनिका मिळणा-या लाभार्थींची पात्रता. | धारावी पुनर्विकास प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासीयांची पात्रता निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या दि.१७.०४.२००८ च्या अधिसुचनेद्वारे दि.०१.०१.२००० ही तारीख पात्रतेकरिता निश्चित केलेली आहे. तसेच दि.१६.०५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार दि.०१.०१.२००० वा त्यापूर्वीच्या संरक्षणपात्र झोपडीत दि.०१.०१.२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या राहत असलेल्या झोपडीधारकांची हस्तांतरण प्रकरणे नियमित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यासाठी निवासी झोपडीचे हस्तांतर शुल्क रू.४०,०००/- व अनिवासी झोपडीचे हस्तांतर शुल्क रू.६०,०००/- भरल्यानंतर अशी हस्तांतरण प्रकरणे नियमित करण्यात येतील. |
| ३ | स्वयंविकास किंवा प्रकल्पातून वगळणे. | धारावीचा पुनर्विकास एकत्रितरित्या (Integrated Development) करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच स्वयंविकास करावयाचा झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३२ नुसार करता येईल. |
| ४ | झोपडीधारकांच्या सदनिकेचे स्वरूप. | प्रत्येक पुनर्वसन सदनिकेमध्ये स्वतंत्र Living Room, Bedroom, आणि Kitchen देण्यात येईल. सदनिकेमध्ये १०% |

| | | |
|---|---|---|
| | | बाल्कनी क्षेत्र समाविष्ट असेल. त्या व्यतिरिक्त ५० चौ.फूटाचे अतिरिक्त क्षेत्रफळ फंजिबल क्षेत्रफळाच्या स्वरूपात देण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे रहिवाश्यांना एकूण वापरण्यायोग्य क्षेत्रफळ (Usable Area) ३५०.०० चौ.फूट राहणार आहे. |
| ५ | चाळीतील व जुन्या इमारतीत राहणा-या रहिवाश्यांना पुनर्विकासाअंतर्गत देण्यात येणा-या सदनिकेंचे क्षेत्र. | धारावीतील म्हाडा तसेच शासकीय संस्थांच्या जुन्या इमारती व चाळींचा विकास नियंत्रण नियमावली ३३ (९)(अ) या नागरी नुतनीकरणाअंतर्गत विकास करताना विकास नियंत्रण नियमावली ३५(४) च्या माध्यमातून ३५% फंजिबल क्षेत्रफळ देऊन ३०० चौ.फूट + ३५% =४०५ चौ.फूट इतके किमान सदनिका क्षेत्रफळ देण्यात येणार आहे. |
| ६ | व्यावसायिक व औद्योगिक गाळे असणा-या झोपडीधारकांना देण्यात येणारे क्षेत्र. | सेक्टर निहाय मोठ्या तसेच ६० फूट व ९०फूट रस्त्यालगत व्यावसायिक गाळेधारकांचे आहे त्याच ठिकाणी व्यापारी संकुलात (Rehab mall), एक किंवा दोन मजल्यांपर्यंत पुनर्वसन करण्याचे नियोजित आहे. |
| ७ | पोटमाळ्यावर राहणा-या रहिवाश्यांच्या झोपड्या. | धारावी अधिसुचित क्षेत्रातील पोटमाळ्यावर राहणा-या रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याची कोणतीही तरतूद नाही. |
| ८ | देखभाल निधीची तरतूद. | प्रत्येक सदनिकाधारकामागे रू.४०,०००/- इतका देखभाल निधी देण्यात येईल. |
| ९ | संक्रमण शिबीरे. | धारावीतील झोपडीधारकांना शक्यतो त्यांच्या घराजवळील परिसरात संक्रमण गाळे (Transit Camp) देण्याचा प्रयत्न राहील. |
| १० | बांधकाम विरहित सोयी सुविधा. | नगर विकास विभागाने अंतिम मंजुरी दिलेल्या नियोजन प्रस्तावास अनुसरून बांधकाम विरहित सोई सुविधा जसे की, खेळाचे मैदान, उद्याने, मनोरंजनाचे मैदान, फुटबॉल ग्राऊंड इत्यादीकरिता आवश्यक ती तरतूद करण्यात आली आहे. |

<table>
<tr>
<td>११</td>
<td>बांधकाम सहित सोयी सुविधा.</td>
<td>धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत सेक्टर निहाय शैक्षणिक सुविधा, वैद्यकिय सेवासुविधा, रूग्णालये, दवाखाने, ग्रंथालये, अग्निशमन केंद्र, व्यायामशाळा, समाज कल्याण केंद्रे, इत्यादी बांधून देण्याचे प्रस्तावित आहे. त्यांचे एकूण बांधीव क्षेत्र खालील प्रमाणे (BUA) आहे. तसेच प्रत्येक सेवासुविधांचे बांधीव क्षेत्र (BUA) दर्शविणारा तक्ता परिशिष्ट “अ” नुसार असणार आहे.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सेक्टर क्रमांक</th><th>क्षेत्र</th></tr>
<tr><td>१.</td><td>१</td><td>२७३१६.९९ चौ.मी.</td></tr>
<tr><td>२.</td><td>२</td><td>५३५५२.०४ चौ.मी.</td></tr>
<tr><td>३.</td><td>३</td><td>३९९६५.५७ चौ.मी.</td></tr>
<tr><td>४.</td><td>४</td><td>४१२५५.९५ चौ.मी.</td></tr>
<tr><td>५.</td><td>५</td><td>२०५८०.६९ चौ.मी.</td></tr>
</table>
या व्यतिरिक्त १०० सदनिकेमागे प्रत्येकी १ बालवाडी व १ कल्याण केंद्रे व सोसायटी ऑफीस नियमानुसार देण्यात येईल.</td>
</tr>
<tr>
<td>१२</td>
<td>धारावी अधिसुचित क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांची पात्रता निश्चित करण्याबाबत.</td>
<td>धारावी अधिसुचित क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांची पात्रता निश्चित करण्याकरिता शासनाने दिनांक २६.१२.२०१३ रोजीच्या अधिसुचनेद्वारे उपजिल्हाधिकारी संवर्गातील ७ सक्षम प्राधिका-यांची नियुक्ती केलेली आहे. जरूर पडल्यास ही संख्या वाढविण्यात येईल.</td>
</tr>
<tr>
<td>१३</td>
<td>धारावी अधिसुचित क्षेत्रातील झोपडपट्टी व्याप्त खाजगी जमिनीचे भूसंपादन.</td>
<td>झोपडपट्टी व्याप्त खाजगी जमिनींचे संपादन महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ प्रमाणे करण्याचे नियोजित आहे.</td>
</tr>
<tr>
<td>१४</td>
<td>महानगरपालिकेच्या जमिनीबाबत.</td>
<td>महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनींचा विकास करण्याबाबत विकास हक्क धारावी पुनर्विकास प्रकल्पाला देण्याबाबत महानगरपालिकेशी दि.१६.०८.२०१३, ३०.०८.२०१३, ०६.०२.२०१४, २६.०६.२०१४,२७.०८.२०१४, १७.०८.२०१५ च्या पत्रान्वये पत्रव्यवहार केलेला असून महानगरपालिकेची अंतिम मंजूरी प्रलंबित आहे.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १५ | रेल्वेच्या जमिनींबाबत. | धारावी अधिसुचित क्षेत्रात सेक्टर क्र.१ व २ मध्ये ९.४६ हेक्टर जमिन असून त्यापैकी अतिक्रमण नसलेली जमिन ७.११ हेक्टर व अतिक्रमण झालेली २.३५ हेक्टर इतकी आहे. सदर जमिनी धारावी पुनर्विकास प्रकल्पास मिळणेबाबत रेल्वे मंत्रालय कडे दि. ०६.०४.२०१३, १६.०५.२०१३ व ०६.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली असता त्यांनी सदर जमिनीं देण्याबाबत दि.१०.०६.२०१५ च्या पत्रान्वये असहमती दर्शविली आहे. परंतु मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावर रेल्वेची जमिन मिळणेबाबत कार्यवाही चालू आहे. |
| १६ | इतर जमिनींबाबत. | धारावी अधिसुचित क्षेत्रात मालकी निश्चित नसलेली ४.८० हेक्टर इतकी जमिन असून सदर जमिनीं शासनाचे नावे करणेबाबत मा.अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई शहर यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला असून सदर प्रकरणी कार्यवाही चालू आहे. |

**परिशिष्ट “अ”**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत अतिरिक्त सुविधा आणि सुविधा अंतर्गत प्रदान करणे.
(खंड ७.१ मधील परिशिष्ट **IV (A)** तरतूद नं.३३ (१०)”(अ) )

| **अ.क्र.** | **सुविधांचा तपशील** | **सुची** | **माप** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **सेक्टर १** | **सेक्टर २** | **सेक्टर ३** | **सेक्टर ४** | **सेक्टर ५** | **एकूण १ ते ५** |
| | बांधकाम योग्य सुविधा ज्यांचे विक्री घटक क्षेत्र उपलब्ध होईल. | | | | | | | | |
| १ | प्राथमिक शाळा | | चौ.मीटर | ९०६६.९७ | १६४३३.८९ | १३६००.४६ | १२४६७.०९ | ५१००.१७ | ५६६६८.५८ |
| २ | माध्यमिक शाळा | | चौ.मीटर | ६०६६.९७ | १६४३३.८९ | १२६५०.५५ | ११५१७.१८ | १००००.०० (with २ colleges) | ५६६६८.५८ |
| ३ | दवाखाने आणि प्रसूतिगृहे | | चौ.मीटर | ६२७२.०० | ११३६८.०० | ९४०८.०० | ८६२४.०० | ३५२८.०० | ३९२००.०० |
| ४ | कल्याण केंद्रे + व्यायामशाळा+समाज मंदिर | | चौ.मीटर | २००.०० | २००.०० | २००.०० | २००.०० | २००.०० | १०००.०० |
| ५ | ग्रंथालय | | चौ.मीटर | २००.०० | २००.०० | २००.०० | २००.०० | २००.०० | १०००.०० |
| ६ | अगिशमन केंद्र | | चौ.मीटर | २००.०० | ०.०० | ०.०० | ३९९०.०० | ०.०० | ३९९०.०० |
| ७ | टपाल कार्यालय | | चौ.मीटर | ६६५.०० | ०.०० | ०.०० | ६६५.०० | ०.०० | १३३०.०० |
| ८ | पोलिस ठाणे | | चौ.मीटर | १९९५.०० | १९९५.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३९९०.०० |
| ९ | किरकोळ वस्तुंचा बाजार | | चौ.मीटर | २५११.०४ | ४५५१.२६ | ३७६६.५६ | ३४५२.६८ | १४१२.४६ | १५६९४.०० |
| १० | पोलिस चौकी | | चौ.मीटर | १४०.०० | १४०.०० | १४०.०० | १४०.०० | १४०.०० | ७००.०० |
| ११ | राष्ट्रीय रचना संस्था व औद्योगिक प्रशिक्षण संस्था | | चौ.मीटर | ०.०० | २२३०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २२३०.०० |
| | एकूण | | | २७३११६.९९ | ५३५५२.०४ | ३९९६५.५७ | ४१२५५.९५ | २०५८०.६४ | १८२४७१.१७ |